सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.

विद्यानगरी,देवपूर - ४२४ ००५

✆ ०२५६२ - २७२१०३ (कार्या.)  ०२५६२ - २७२१०३ (फॅक्स)

Web :www.gpdhule.org  Email:office.gpdhule@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शिमदाराशातंनिधु/विवि/२०२०/अ-  दिनांक:-३१/०७/२०२०

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ऑनलाईन व्दितीय व तृतीय वर्ष प्रवेशा संबंधी सुचना

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील या संस्थेतील सर्व शाखेतील व्दितीय व तृतीय वर्ष पदविका **(Second & Third Year Diploma)** अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी **www.gpdhule.org.in** या संकेतस्थळावर जावून दिनांक ०३/०८/२०२० ते १२/०८/२०२० या कालावधीत खालील प्रमाणे ऑनलाईन प्रवेश अर्ज व ऑनलाईन शुल्क भरावे. व संपुर्ण कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावेत. सदरची प्रवेश प्रक्रिया फक्त ऑनलाईन असल्याने कोणत्याही विदयार्थी/पालक यांनी संस्थेत येउ नये.कोरोना विषाणु समस्येमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संपुर्ण प्रवेश प्रक्रिया शासन नियमांनुसार विशेष काळजी घेउन पुर्णपणे ऑनलाईन राबविण्यात येत आहे.

| अ.क्र. Sr.No | उत्पन्न मर्यादा (Income Limit) | प्रवर्ग (Category) | शिक्षण शुल्क (Tuition Fees) | अशासकीय शुल्क (Non Govt. Fee) | एकुण शुल्क (Total Fees) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वर्षिक उत्पन्न रू.८ लाखापेक्षा कमी असलेले विदयार्थी (Income **less than 8 Lac.)** | Open/OBC/VJNT/SBC/ SEBC/ EWS | 3000 | 1550 | 4550 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | वर्षिक उत्पन्न रू.८ लाखापेक्षा जास्त असलेले विदयार्थी (Income **More than 8 Lac.)** | Open/OBC/VJNT/SBC/ SEBC/ EWS | 6000 | 1550 | 7550 |
| 3 | ---- | TFWS | 0 | 1550 | 1550 |
| 4 | वर्षिक उत्पन्न रू.८ लाखापेक्षा कमी व जास्त असलेले विदयार्थी (Income **less than 8 & More than 8 Lac.)** | SC/ ST | 0 | 1550 | 1550 |
| 5 | वर्षिक उत्पन्न रू.८ लाखापेक्षा कमी असलेले विदयार्थी (Income **less than 8 Lac.)** | MINORITY | 6000 | 1550 | 7550 |

१. प्रथमत: विदयार्थ्यांनी **www.gpdhule.org.in** या संस्थेच्या संकेतस्थळावर जावे. त्यानंतर Online Payment या ऑपशनवर क्लीक करावे किंवा - Google - SBI Collect – Proceed- Maharashtra- Educational Institution – Principal Government Polytechnic, Dhule – Second & Third Year Admission. या पध्दतीने कार्यवीही करून वरीलप्रमाणे प्रवर्गनिहाय शुल्क भरावे व ०२ प्रतीमध्ये त्याची पावती घ्यावी. १ पावती संस्थेसाठी व १ पावती विदयार्थ्यासाठी घेणे बंधनकारक आहे.

२. वरीलप्रमाणे ऑनलाईन शुल्क भरल्यानंतर Admission Second & Third Year यावर क्लीक करावे. त्यानंतर आपल्याला ॲडमिशन घ्यावयाची शाखा निवडावी. त्यांनंतर २ पेजमध्ये (दोन भाग)ऑनलाईन प्रवेश अर्ज दिलेला आहे. त्यावर प्रथम भागामध्ये विदयार्थ्याने आपला ईमेल आयडी तसेच ऑनलाईन पेमेंट केलेल्या पावतीवरील BU/DU नंबर व दिंनाक, रक्कम याचा तपशील भरावा.

३. प्रवेश अर्जाच्या दुस-या भागामध्ये आपला फोटो तसेच इतर सर्व शैक्षणिक कागदपत्रे कॅप ॲलॉटमेंट लेटर,मार्कशीट,जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र ,उत्पन्न दाखला , इ.अपलोड करावी. व संपुर्ण तपशील भरावा.सदरचा प्रवेश अर्ज विदयार्थी आपल्या मोबाईलवर किंवा संगणकावर वरील प्रमाणे सुचनांचा अवलंब करून सुलभ पध्दतीने भरावयाचा आहे. व अर्ज भरताना आपली सर्व कागदपत्रे सोबत ठेवावी. जेणेकरून प्रवेश अर्ज भरताना कोणतीही समस्या उध्दभवणार नाही.

**४.आवश्यक असणारी कागदपत्रे**

a.ऑनलाईन पेमेंट केल्याची SBI Collect ची पावती.

b.कॅप ॲलॉटमेंट लेटर ची छायांकीत प्रत.

c.मागील सर्व सत्रांचे मार्कशिट.
d. उत्पन्न प्रमाणपत्र सन २०१९-२० (३१ मार्च २०२१ पर्यंत वैध असेलेले)
e. जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर (लागु असल्यास)
f. डोमीसाईल प्रमाणपत्र.

५. तसेच सर्व शिष्यवृत्ती [ Scholarship/ Freeship ] पात्र विदयार्थ्यांना शिक्षण शुल्कामध्ये सवलत देण्यात आलेली आहे. त्या सर्व विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती पोर्टल सुरू झाल्यानंतर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे बंधनकारक आहे. विदयार्थ्यांचे अर्ज संबधित विभागाकडुन मंजुर झाल्यानंतरच शिक्षण शुल्कात दिलेल्या सवलतीची प्रतिपुर्ती संबधित विभागाकडुन होत असल्याने शिष्यवृत्ती अर्ज योग्य पध्दतीने व विहीत वेळेत भरण्याची संपुर्ण जबाबदारी विदयार्थ्याची राहिल. तसेच संबधित विभागाकाने कागदपत्रांअभावी/ पात्र न ठरल्यास/ अर्ज फेटाळल्यास शिष्यवृत्ती मंजुर न झाल्यास शिक्षण शुल्काची रक्कम भरणे विदयार्थ्यास बंधनकारक राहील याची सर्व विदयार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

६. जरी आपणास पुढील वर्षामध्ये नियीमत प्रवेश देण्यात आला असेल तरी देखील ज्या विदयार्थ्यांचे मागील सत्राचे (Backlog Subject ) विषयाची परीक्षा तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाने निर्धारीत केलेल्या वेळेत /पध्दतीनुसार देणे बंधनकारक राहील.

७. सदर प्रवेश हे मा.संचालक,महाराष्ट राज्य तंत्रशिक्षण मंडळ ,मुंबई यांचेकडील दिंनाक १५/०५/२०२० च्या परीपत्रकानुसार देण्यात येत असुन भविष्यात सदर नियमांमध्ये काही बदल झाल्यास व त्यामुळे प्रवेश रदद करावा लागल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची संबधित सर्व विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच विदयार्थी व पालक यांना पुनश्चः सुचित करण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संपुर्ण प्रवेश प्रक्रिया विशेष काळजी घेउन पुर्णपणे ऑनलाईन राबविण्यात येत असल्याने कोणत्याही विदयार्थी/पालक यांनी संस्थेत येउ नये. तसेच प्रवेशासंबधी काही समस्या असतील तर खालील प्रमाणे अधिव्याख्याता व विदयार्थी विभाग तसेच संबधित विभागप्रमुख यांचे भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १.स्थापत्य अभियांत्रिकी | - श्री.ए.ए.अन्सारी - | मो.न.- ९८६००९७८७३ |
| २.विदयुत अभियांत्रिकी | - श्री.एस.एम.एस सय्यद - | मो.न.- ७२७६२५६०२० |
| ३.यंत्र अभियांत्रिकी | - श्री.डी.डी.लोभी - | मो.न.- ९०२८२७३१०० |
| ४.स्वयंचलन अभियांत्रिकी | - श्री.ए.एन.पवार - | मो.न.- ९४२२८९५९७६ |
| ५.संगणक अभियांत्रिकी | - श्री.एस.पी.आरूटवार - | मो.न.- ९८९२२५८२०१ |
| | - श्री.जी.जे.पालवे.- | मो.न.- ९४२०७९१३७१ |

विदयार्थी विभाग -

१. श्री.एम.पी.जाधव - ८६९८९२६८२०
२. श्री.ए.एम.आवारी - ८६६८२७५९२६

**वरीलप्रमाणे संपुर्ण सुचनांचे काटेकोर पालन करून विहित कालावधीत ऑनलाईन प्रवेश घ्यावा तसेच कागदपत्रे अपलोड करताना PDF फॉरमॅट मध्ये व व्यवस्थीत अपलोड करावी. प्रवेशाची संपुर्ण कागदपत्रे आपल्याजवळ भविष्यातील कामकाजासाठी जतन करून ठेवावी. प्रवेश अर्ज भरताना घाई-गडबड टाळावी व सर्व कागदपत्रे स्कॅन करून PDF फॉरमॅट मध्ये जतन करून ठेवावी.**

( डॉ.रा.गो.वाडेकर)
प्राचार्य
शिक्षण महर्षि दादासाहेब रावल
शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.

प्रत-१. सुचना फलक - मुलांचे/मुलींचे वसतिगृह शि.म.दा.रा.शासकिय तंत्रनिकेतन धुळे.

२. विदयार्थी विभाग सुचना फलक शि.म.दा.रा. शासकिय तंत्रनिकेतन धुळे.

३. सर्व विभागप्रमुख- स्थापत्य /विदयुत /यंत्र /स्वयंचलन /संगणक/सायन्स यांना माहीती व कार्यवाहीसाठी.
/-आपणास कळविण्यात येते की वरील सुचना आपल्या विभागातील विदयार्थ्यांच्या व्हाट्सअॅप क्रमांकावर पाठविण्यात यावी. व विशेषत्वाने ऑनलाईन जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी.

४. विभागप्रमुख संगणक विभाग शि.म.दा.रा. शासकिय तंत्रनिकेतन धुळे.
/-आपणास कळविण्यात येते की वरील सुचना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिदध करावी व विदयार्थ्यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर पाठविण्यात यावी.